# i2h वार्तापत्र

वृंदावन कॉलनी, चिलम छावनी जवळ, कॅम्प रोड, अमरावती.- 444602

फेब्रुवारी 2013

## अनुक्रमणिका


- ❖ प्रास्ताविक…. 2
- ❖ समाजबदलाविषयी….. - जे कृष्णमुर्ती 3
- ❖ i2h ची ओळख 4
- ❖ आमचे सहयोगी 4
- ❖ महत्वाच्या घडमोडी 7
- ❖ i2h मधील वार्ता 7
- ❖ काही क्षणचित्रे 8
- ❖ काही विचार करण्याजोग्या गोष्टी... 9

प्रिय मित्र/ मैत्रीणींनो,

i2h वार्तापत्राची प्रथम आवृत्ती आपल्यासमोर सादर करतांना मनस्वी आनंद होत आहे. i2h च्या विविध कृतीकार्यक्रमांविषयी माहिती व्हावी, आपली सर्वांची जवळीकता वाढावी, आणि आपल्या सर्वांच्या ह्रदयात तेवत असणाऱ्या आपूलकीच्या, जिव्हाळ्याच्या स्पर्शाची जाणीव व्हावी याकरीता काहीतरी माध्यम असावे असे वाटत होते.

i2h हे स्वयंसेवी संस्थांच्या यादीतील काहीसे नवीन नाव आहे. त्यामुळे तुम्ही थोडेसे शंकीत आणि सावध असणे साहजिक आहे. त्यामुळे तुमच्या मनात असलेला किंतू समजावून घ्यावा, तुमच्यापर्यंत पोहोचावे, तुमची मतं, विचार जाणून घ्यावीत आणि सर्वात महत्वाचे म्हणजे तुमच्या सतत संपर्कात राहावे यासाठी इतर माध्यमांपेक्षा वार्तापत्र हे अधिक सरस वाटले.

व्यक्ती-व्यक्तींमधील नात्याची गुंफण ही त्यांच्यामधील विश्वास आणि पारदर्शकता यामुळे आधिक दृढ होत असते. आपल्याला हे मान्य करावे लागेल की, इतर नात्यांमध्येही ही बाब महत्वाची असते मग ते नाते व्यक्ती आणि संस्था किंवा संस्था आणि व्यक्ती यांमधील असो. याच विश्वास आणि पारदर्शकतेच्या बांधणीकरीता, एकमेकांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, इतरांच्या भावना समजून घेणे, भावनांची, विचारांची देवानघेवान करणे आणि त्यांच्या आयुष्यात काय सुरु आहे याविषयी परिचित असणे महत्वाचे असते. हेच आपल्याबाबतीत सुध्दा सत्य आहे. या वार्तापत्राचा उद्देश्यच मूळी आपल्या सर्वांमध्ये विश्वास आणि पारदर्शकता राहावी हा आहे.

मला विश्वास वाटतो आहे की, हे बातमीपत्र आपल्या सर्वांच्या डोळे, कान व ह्रदयाचे कार्य करेल, ज्यामुळे आपण बघू शकू, ऐकू शकू आणि आपली मते प्रदर्शित करू शकू जेणेकरुन आपले नाते अधिक दृढ आणि दिर्घायुषी होईल.

# समाजबदलाविषयी.......- जे. कृष्णमुर्ती.



सामाजिक बदल हे नियम आणि सत्तेतून घडवले जातात, मात्र जोवर व्यक्तींमधे अमुलाग्र सकारात्मक बदल होत नाहीत तोवर ते नवीन बदल आणि नियमांवर कुरघोडी करत राहतील जे आज जगात घडत आहे.

मला तरी माणसाच्या अस्तित्वाची जाणीव फार महत्वाची वाटते, कारण व्यक्तींमध्ये झालेले बदलच समाजात क्रांती घडवून आणू शकतात. इतिहासात डोकावल्यास कळत की समाजात क्रांतीकरी बदल नेहमीच एक-एकट्या व्यक्तीनी घडवून आणले. आता तुमच्या माझ्यातली व्यक्ती समाजात असा अमुलाग्र बदल घडवून आणू शकेल काय?

या व्यक्ती व्यक्ती मधल्या नवीन पद्धतीच्या बदलाची आम्हांला काळजी आहे, आणि मला असं वाटते की हीच शिक्षणाची सर्वोच्च पातळी आहे.

# i2h ची ओळख

### i2h म्हणजे काय ? / i2h काय आहे?

Investment in Humans (i2h) ही समाजातील खऱ्याखुऱ्या हीरोंना सहाय्य करण्यास बांधीलकी जपणारा एक परीवार. प्रामाणिकपणा, पारदर्शकता, विश्वासार्हता आणि एकनिष्ठता ही मूल्ये या परीवाराचा गाभा आहेत. i2h ही केवळ एक संस्था नसून वरील सर्व मूल्ये प्रत्यक्ष जीवनात अंगीकारलेल्या समविचारी व्यक्तींचा एक घट्ट वीण असलेला हा परीवार आहे. हे सर्वच त्यांच्या ह्रदयात तेवत असणाऱ्या शमेला सतत तेववत ठेवण्यासाठी एकमेकांना सहाय्य व प्रोत्साहन देण्यास कटीबध्द आहेत. समानता, बंधूता आणि स्वीकृती या मूल्यांची जपणूक करतच, या वसुंधरेच्या लेकरांना त्यांच्या अस्तीत्वाकरीता आणि विकासाकरीता आवश्यक सर्व घटकांची परीपूर्तता व्हावी या ध्येयासाठी स्वयंप्रेरणेने, स्वईच्छेने करात कर गुंफून वाटचाल करण्याचा स्वत:शी निर्धार केलेल्या या प्रवासात एकत्र आलेले सहप्रवाशी.

आम्ही सर्व निरोगी अशा समाजाचे स्वप्न बघतो की, ज्या समाजात मनूष्यप्राण्याला त्याच्या अस्तीत्वासाठी, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण अशा मुलभूत गरजांसाठी झगडावे लागणार नाही आणि ज्यात सर्वांना समानतेची वागणूक व समान संधी असेल. आम्ही सर्वच असा समाज पाहू ईच्छितो आणि त्यात राहू ईच्छितो. **i2h** अशा संस्था व व्यक्ती जे शिक्षण, आरोग्य व समाजसेवा यांच्या माध्यमातून समाजात समानता आणून सौहार्दपूर्ण नाते स्थापीत करू इच्छीतात त्या समाज उत्थान कार्याला सहाय्य करण्याचा मानस ठेवते. अशा सर्व संस्था व व्यक्तींना त्यांच्या सुरवातीच्या काळात आर्थिक, मनुष्यबळ व कौशल्ये याबाबतीत सर्वतोपरी मदत करण्यास आम्ही कटीबध्द आहोत. हे सर्व प्रकल्प आणि व्यक्ती ही आपली सामाजिक जबाबदारी आहे, असे आमचे ठाम व प्रामाणिक मत आहे. या सर्व प्रकल्प व व्यक्तींसाठी लघू अर्थव्यवस्था ( Microfinance) उभारण्याचा आमचा प्रयत्न आहे. सध्या या प्रकल्पांना अंशत: सहाय्य व शिश्यकुल सारखे नवीन प्रकल्प सुरु करण्याचा आमचा मानस आहे.

# आमचे सहयोगी

### रंजित आचार्य



पुण्याच्या कर्वे समाजविज्ञान संस्थेमधून पदव्युत्तर पदवी प्राप्त. शिकत असतांना प्रथमच सेवालय संस्थेला भेट दिली आणि मूळातूनच तो या संस्थेकडे ओढला गेला. सेवालयाची सुरुवात एका पडीक जागेमध्ये श्री. रवी बापटले यांनी केली होती. आज सेवालय 30 एडसग्रस्त मुलामुलींचे घर बनले आहे. रंजीतने सेवालयाच्या माध्यमातून आपले संपूर्ण जीवन या एडसग्रस्त मुलामुलींचे शिक्षण व पूनर्वसन यासाठी देण्याचे ठरवले आहे.
. Read more..

स्वयंसेवी संस्था – आम्ही सेवक
प्रकल्प – सेवालय, मु. हसेगाव, ता. – औसा, जि. – लातूर.
ई – मेल – ranjeet.fcw@gmail.com
संपर्क क्र - +91 844 686 5908

## संतोष गरजे



संतोषचा जन्म मजूर कुटुंबात झाला. बहीणीच्या निधनानंतर तिच्या मुलाबाळांची काळजी घ्यायला कोणीही नाही हे बघितल्यानंतर संतोषने त्यांना दत्तक घेण्याचे ठरवले. हाच त्याच्या आयुष्यातील अमुलाग्र बदल घडवणारा मोलाचा क्षण ठरला. त्यानंतर त्याने त्याच्या आसपासच्या परिसरातील अनाथ मुलामुलींचा शोध घ्यायला सुरुवात केली आणि त्यांचे एक घरकुल निर्माण केले. सहारा अनाथालय परिवार हे बीड जिल्ह्यातील गेवराई येथे 42 अनाथ मुलामुलींचे घर ठरले आहे. Read more…

स्वयंसेवी संस्था – आई जनहीत बहुउद्देशिय सेवाभावी संस्था.
प्रकल्प – सहारा अनाथालय परीवार
शिवाजी नगर, गेवराई, जि. – बीड (महाराष्ट्र)- 431127
संपर्क क्र. - 07588177979, 02447262266

## सदानंद तायडे



आर्थिकदृष्ट्या मागास घरात जन्म झाला. लहानपणीच वडीलांचे देहावसान झाल्यामुळे जगण्यासाठी लहानपणापासूनच काम करणे भाग पडले. संत गाडगे बाबांच्या कार्याने प्रेरीत होवून त्याने स्वत: झाडू हातात घेतला आणि 165 पेक्षा आधिक गावे स्वच्छ केली. सोबतच आरोग्य, शिक्षण, मूल्ये इत्यादींविषयी किर्तन करुन ग्रामस्थांचे प्रबोधन करायला सुरुवात केली. सदानंद व त्याची आई स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी आणि पारधी समाजाच्या मुलांच्या सांभाळाकरीता भाजी व ---- यांची विक्री करतात. पारधी मुलांसाठी सदानंदने इंदिरालय नावाने घर व शाळा असा दुहेरी प्रकल्प चालवला आहे. Read more…

स्वयंसेवी संस्था – इंदिरालय
प्रकल्प – इंदिरालय, जि. वाशीम. (महाराष्ट्र)
ई – मेल - tayadesadanand@gmail.com
संपर्क क्र. - 8055380270, 9921555387

Investment In Humans

## डॉ. प्रशांत कुचनकर



आयुर्वेदीक महाविद्यालयात शिकत असतांना तिथे जे काही शिकवले जात होते त्याविषयी प्रशांतच्या मनात अनास्था निर्माण झाली आणि स्वत:च काहीतरी शोधले पाहिजे ही भावना त्याच्या मनात रुजू लागली. त्यामुळे आयुर्वेदातील महाविद्यालयीन शिक्षण चालू असतांनापासूनच औषध holistic and integrated approach शोधासाठी तो विविध चर्चासत्रे आणि परिषदांना हजेरी लावू लागला. पदवी पूर्ण होताच विविध औषधशास्त्रातील नामवंत व्यक्तींचे मार्गदर्शन मिळवण्यासाठी व शिकण्यासाठी त्याने भारतभ्रमण सुरु केले. व्यवसायाने डॉक्टर असलेल्या प्रशांतने गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम अशा कुरखेडा येथे लोकांना वैद्यकिय सेवा देणे सुरु केले. शहरांमध्ये उपलब्ध असलेल्या वैद्यकिय सोयीसुविधा, ग्रामीण व आदिवासी लोकांना सुध्दा अतिशय अल्प दरात मिळाव्यात या कार्याकरीता त्याने आपले संपूर्ण आयुष्य देण्याचे ठरवले आहे. Read more…

ई – मेल - tarun.seva@gmail.com
संपर्क क्र. - 08275400220

## सूनिल मेकाले



महाराष्ट्रातील मराठवाड्यात एका शेतमजूर कुटुंबात सूनिलचा जन्म झाला. लातूरच्या भूकंपानंतर सूनिलचे कुटुंब मुंबईतील दहीसर भागातील झोपडपट्टीत स्थलांतरीत झाले. या वस्तीतील टोळी युध्दे, अमली पदार्थांचे सेवन, व्यसनाधिनता, तरुणांची शिक्षणातील गळती या व अशा अनेक वाईट गोष्टींचे दर्शन त्याला रोजच व्हायचे. त्याला जसे कळू लागले तसे त्याने ठरवले की, आपणही शिकले पाहिजे आणि इतरांनाही शिकवले पाहिजे. त्याने मुंबईतील टाटा समाजविज्ञान संस्थेतून (TISS) M.S.W. पूर्ण केले आणि आपल्या संस्थेच्या माध्यमातून त्या वस्तीतील मुलांच्या विकासाकरीता विविध प्रकल्प राबवायला सुरुवात केली.

Read more….

| | | |
|---|---|---|
| स्वयंसेवी संस्था | - | आय कलर |
| प्रकल्प | - | आय कलर, दहिइसर, मुंबई. |
| ई – मेल | - | sunilcbm@gmail.com ; dreamcolourindia@gmail.com |
| संपर्क क्र. | - | 07666010177, 09969969626 |

## शरद अष्टेकर



विदर्भातील ग्रामीण व दुर्गम भागातील तरुणांपर्यंत उत्तम पुस्तके पोहोचवून वाचनसंस्कृती निर्माण व विकसित करणे हे याचे स्वप्न आहे. त्यासाठी त्याने विदर्भातील ग्रामीण व दुर्गम अशा गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती जिल्ह्यात पुस्तक प्रदर्शने आयोजित केली आहेत. त्याचप्रमाणे शाळा, महाविद्यालये, दवाखाने इथेही प्रदर्शने भरवून विशेषत: महाविद्यलयीन तरुणांना अतिशय मोजक्या दरात पुस्तके उपलब्ध करुन दिली आहेत.

दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत कॉपी करतांना पकडला गेला. शाळा सोडली आणि ट्रेनमध्ये शेंगदाणे, गुटखा, सिगारेट विकणे सुरु केले. पण रेल्वे पोलीसांच्या रोजच होणाऱ्या त्रासाला कंटाळून त्याने वर्तमानपत्रे विकण्याचे ठरवले. हाच निर्णय त्याचे संपूर्ण आयुष्य बदलवणारा ठरला. त्याला वाचनात रस यायला लागला आणि अर्धवट राहीलेले शिक्षण पूर्ण करण्याचे त्याने ठरवले. याच वाचनातून त्याला डॉ. अभय बंग आणि बाबा आमटे यांच्या कार्याची ओळख झाली आणि कोणत्याही प्रकारे का होईना पण समाजकार्यात हातभार लावण्याचे त्याने ठरवले. Read more…

| | | |
|---|---|---|
| प्रकल्प | - | माय मराठी |
| ई – मेल | – | yuvashakti.ms@gmail.com |
| संपर्क क्र. | - | 08087288872, 09011135057 |

## चेतन मेश्राम



बिहार गर्ल प्रकल्पातील मुलींच्या भोजन, निवास, शिक्षण आणि इतर खर्चांना सहाय्य करण्याचे काम त्याने सुरु केले. या सर्व मुली बिहारमधील अतिमागास समुहातील आहेत. जर या मुलींना ही मदत मिळाली नसती तर कदाचित अल्पवयातच या मुलींचे लग्न लावून दिले गेले असते. इतर मुलींप्रमाणे याही मुली लिंगभेदाच्या बळी पडल्या असत्या. या प्रकल्पा अंतर्गत, या मुलींना शिक्षण देवून सक्षम करणे आणि लिंगभेद नाहीसा करण्यास कार्य करण्यासाठी त्यांना प्रेरीत करणे असा समाजबदल चेतनला अपेक्षित आहे. सध्या या मुलींचे पदवीपर्यंतचे शिक्षण नागपूर येथील दयानंद महाविद्यालय, जरीपटका येथे सुरु आहे. Read more…

| | | |
|---|---|---|
| स्वयंसेवी संस्था | - | NNBY |
| प्रकल्प | - | बिहार गर्ल प्रकल्प, नागपूर. |
| ई – मेल | - | indiannby@gmail.com |
| संपर्क क्र. | - | 9011094490, 7122655850. |

## नकुल सोनटक्के



अमरावती जिल्ह्यातील येवदा या खेड्यात नकुलने बचत गट स्थापण केले आहेत. याच खेड्यातील तरुणांना एकत्र करुन त्याने संगणक प्रशिक्षण देणे सुरु केले आहे आणि तरुणांची Motivation शिबीरे सुध्दा आयोजित करत असतो. त्याने आपले आयुष्य शिक्षण आणि स्वयंरोजगार याविषयी तरुणांचे प्रबोधन करण्यासाठी वाहण्याचे ठरवले आहे. तो स्वामी विवेकानंद व इतर समाजसुधारकांच्या पुस्तकांची प्रदर्शने सुध्दा भरवत असतो. Read more….


प्रकल्प – येवदा, ता. दर्यापूर, जि. अमरावती – 444706

ई – मेल - nakulsonakke@gmail.com

संपर्क क्र. - 9561445108


# महत्वाच्या घडामोडी

मागील काही दिवसात आमच्या मित्रपरीवारापैकी काहींजण वर्तमानपत्रातून चर्चेत होते. आम्ही त्यांच्याशी संलग्न आहोत याचा आम्हाला अभिमान वाटतो. दै. लोकसत्ताच्या करीअर वृत्तांत या सदरात राजू भडके आणि डॉ. प्रियदर्श तूरे यांच्या कार्यावर आणि त्यांच्या जीवन ध्येयांवर लेख प्रसिध्द झाले होते.

लेखांच्या लींक खालीलप्रमाणे :

राजू भडके : loksatta, 10th dec 2013

डॉ. प्रियदर्श तूरे : loksatta, 11th feb 2013

# i2h मधील वार्ता

आपल्या सर्वांनाच अत्यानंदाची बाब अशी की, शिष्यकुल प्रकल्पाच्या ( Project shishyakool ) कामाला सुरुवात झालेली आहे. चिखलदरा तालुक्यातील कोटमी या गावातील शाळेच्या प्रस्तावित जागेवर गणराज्य दिनाचे औचित्य साधून सहा रोपट्यांचे रोपन करण्यात आले. याप्रसंगी कोटमी गावचे सरपंच, तलाठी व ग्रामस्थ उपस्थित होते. आपल्या सर्वांना ज्ञातच आहे की, i2h ने कोटमी या गावात शिष्यकुल प्रकल्पाची सुरुवात करण्याचे निश्चित केलेले आहे . शिष्यकुल प्रकल्पात शाळा, दवाखाना आणि विज्ञान आश्रम यांचा समावेश आहे. Read more……..

## काही क्षणचित्रे :



सरपंचांच्या हस्ते वृक्षारोपन

रोहन व श्री. तुरे काका →



## आमची गॅंग





# काही विचार करण्याजोग्या गोष्टी...

## आपण समाजकार्य का करतो?

**प्रश्न :- मला समाजकार्य करायचं आहे मात्र कळत नाही सुरु कसं करु?**

जे. कृष्णमूर्ती**:** मला असं वाटत की तुम्हाला समाजकार्य कसं करायचं यापेक्षा ते का करायचं आहे हे शोधणं फार महत्वाचं आहे. का करावंस वाटत तुम्हाला समाजकार्य? जगात रोगराई, गरिबी, शोषण, गरीब आणि श्रीमंतात मोठा फरक, माणसा माणसात तंटे आहेत म्हणून? ही आहेत कारणं? तुम्हाला समाजकार्य करावंस वाटत कारण तुमच्या हृदयात प्रेम, दया आहे आणि म्हणून तुम्हाला स्वतःच्या इच्छा-आकांक्षांपुर्तीची फार काळजी नाही म्हणून? की समाजकार्य ही फक्त एक स्वतापासुनची पळवाट आहे?

उदाहरणार्थ आता हेच पहा, जुनाट लग्नाच्या पद्धती आणि त्यातील समस्या पाहून तुम्ही म्हणता "मला लग्नच नाही करायचं" आणि त्या ऐवजी स्वतःला समाजकार्यात झोकून देता, किंवा तुमचे पालक तुम्हाला त्यात पडायला लावता किंवा तुमचं ते ध्येय असतं. जर ती एक पळवाट असेल, किंवा तुम्ही कुठल्या धर्मगुरू, इतर व्यक्ती, समाजाने ठरवलेली ध्येय गाठत असाल तर तुम्ही अजून एका समस्येला आमंत्रण द्याल. मात्र जर तुमच्या हृदयात प्रेम असेल, जर तुम्ही सत्याच्या शोधात असाल, आणि खऱ्या अर्थाने धार्मिक असाल, ध्येयवादी नसाल, जर कुणाच्या सांगण्यावरून ते करत नसाल, तर तुमच्या आयुष्यात, समाजात खरोखर काही अमुलाग्र बदल घडवाल.

मला वाटतं हे समजून घेण खूप महत्वाचं आहे की जेव्हा तुम्ही तरुण असता, काहीतरी करण्याची इच्छा असते, तेव्हा समाजकार्याचा बोलबाला असतो, पुस्तकं त्याबद्दल सांगतात, वर्तमानपत्रातही तेच असतं, काही महाविद्यालयातही समाजकार्य शिकवलं जातं आणि खूप काही... पण हेही खरच की स्वतःला, आपल्या नात्यांना समजून घेतल्याशिवाय केलेल्या समाजकार्यमुळे आपणच संकटात येऊ.

क्रांतिकारी बदल घडवणारे नेहमीच आनंदी आणि स्वतःकडे संग्रह न करणारेच झाले आहेत, पळवाट काढणारे नाही! खऱ्या आनंदी व्यक्तीसाठी त्याचं कामच त्याचा धर्म राहिला आहे. पण तुम्ही फक्त एक मोठा सामाजिक कार्यकर्ता झालात तर तुमचं हृदय रिकामच राहील. तुम्ही कदाचित तुमची धनसंपत्ती दान कराल किंवा लोकांना तसं करायला प्रवृत्त कराल, आणि खूप बदल घडवाल, मात्र जोवर तुमचं हृदय रिकाम आहे आणि डोक्यात फक्त कल्पना आहेत, तोवर तुम्ही एक निरर्थक आयुष्यच जगात असाल. म्हणूनच आधी स्वतःला जाणून घ्या, त्यातूनच मग योग्य कृती जन्माला येईल.

-जे. कृष्णमूर्ती

## निस्वार्थीपणाचा ध्यानात होणारा बदल

निस्वार्थीपणा ही एका चांगल्या मार्गाची सुरवात होय. मार्गाची सुरवात होते ती निस्वार्थीपणामुळे हृदयाला मिळणाऱ्या आनंदापासून. जेव्हा आपण निस्वार्थीपणा अवलंबतो तेव्हा एक सरळ, शुद्ध आनंदलहर मुक्तपणे वाहू लागते आणि आपण तो देण्याच्या विचारातला, देतानाचा आणि आपण दिलं या भावनेतला आनंद अनुभवतो.

आपण जर निस्वार्थीपणा बाळगला तर आपण एक चांगल व्यक्तीमत्व, सुंदर व्यक्ती म्हणून घडत जातो, कारण आपण सतत आपल्या सीमा तपासात असतो. आपला मोह आपल्याला सांगतो, “मी एवढंच देईल, जास्त नाही” किंवा “ही वस्तू देऊन माझं पुरेसं गुणगान होणार असेल तरच मी ती देईल”. मात्र निस्वार्थीपणामधे आपण याच्याही पलीकडे पाहतो आणि अनुभवतो की आपण त्यापलीकडेही जाऊ शकतो.

म्हणूनच, निस्वार्थीपणा म्हणजेच मन मोठ करणं. आपण आपल्या कक्षा पाहतो आणि त्यांना सतत रुंदावत राहतो ज्यामुळे मनाच्याही कक्षा रुंदावतात. आणि हाच आनंद, स्व:तबद्दल असलेला आदर, या रुंदावलेल्या कक्षाच ध्यानधारणेसाठी पूरक ठरतात. इथूनच आपण सखोल परीक्षण करायचं असतं, कारण याच आनंद आणि मनाच्या मोठेपणामुळेच आपल्यात समोर जे काही उभं ठाकेल त्याला सामोरं जाण्याची ताकद येते.

आपलं पहिलं ध्येय आपलं मन बांधून ठेवणाऱ्या, सीमा आखणाऱ्या गोष्टीपासून मुक्त करण हे आहे. मोह, हव्यास आणि वेगवेगळे बंध सीमारेषेसारखे असतात. जर स्वतःच्या पुर्णतेसाठी आपण सतत कुणा व्यक्ती अथवा गोष्टीची वाट पाहत बसलो तर आपण त्या क्षणाची परिपूर्णता गमवून बसतो. हे पाण्यातल्या प्रतिबिंबावर वाकून पाहण्यासारख आहे, फक्त ते आपल्याला पकडू शकत की नाही हे तपासून पाहण्यासाठी, तिथे कुणी आहे की नाही हे बघण्यासाठी! आपलं दुसरं ध्येय इतरांना बंधनातून मुक्त करणं, सेवेच आणि आनंदाच भांडार सगळ्यांसाठी उघडणं, जगातील दुख कमी करण हे आहे. जेव्हा आपल्याला निस्वार्थीपणाची, देण्याची मनापासून इच्छा असते तेव्हा आपल्याला आतल्या शांततेची, आनंदाची जाणीव होते, आणि सगळ्या मानवजातीसाठी प्रेमाची सिमाविरहीत भावना आपल्याला व्यापून टाकते. काहीतरी देण्याची बाह्य भावना आतल्या ध्यानधारणेला मोठ्या प्रमाणात प्रभावित करते आणि त्याचबरोबर हे उलटही घडतंच.

-शरोन साल्झबर्ग *Generosity's Perfection* मधे

(दोन्ही लेख परवानगीने http://www.awakin.org वरून साभार)